# काट्याच्या अणीवर वसले तीन गाव या ज्ञानदेवांच्या भारुडाचे चिकित्सक विवेचन

**रुपाली रघुनाथ वाडेकर**

सहाय्यक प्राध्यापिका, संस्कृत विभाग,

विलिंग्डन महाविद्यालय, सांगली.

काट्याच्या अणीवर वसली तीन गावें ।
दोन ओसाड एक वसेचिना ॥१॥

वसेचिना तिथे आले तीन कुंभार ।
दोन थोटे एका घडेचिना ॥२॥

घडेचिना त्याने घडली तीन मडकी ।
दोन कच्ची एक भाजेचिना ॥३॥

भाजेचिना त्यांत रांधले तीन मुग ।
दोन हिरवे एक शिजेचिना ॥४॥

शिजेचिना तेथे आले तीन पाहुणे ।
दोन रुसले एक जेवेचिना ॥५॥

जेवेचिना त्याला दिल्या तीन म्हशी ।
दोन वांझ्या एक फळेचिना ॥६॥

फळेचिना तिला झाले तीन टोणगे ।
दोन मेले एक जगेचिना ॥७॥

जगेचिना त्याचे आले तीन रुपये ।
दोन खोटे एक चालेचिना ॥८॥

चालेचिना तिथे आले तीन पारखी ।
दोन आंधळे एका दिसेचिना ॥९॥

दिसेचिना त्याला मारल्या तीन बुक्क्या ।
दोन हुकल्या एक लागेचिना ॥१०॥

ज्ञानदेव म्हणे याचा तो अनुभव ।
सद्गुरूवाचुनि कळेचिना ॥११॥

ज्ञानेश्वर माउलींचे हे भारुड म्हणजे ब्रह्मदेवाच्या 'द' कार उपदेशाप्रमाणे आहे. बृहदारण्यक उपनिषदामध्ये ही कथा आहे, की देव, दानव, मानव ही ब्रह्मदेवाची तीन अपत्ये. या तिघांनी आपला शिक्षाभ्यास ब्रह्मदेवाकडे राहून समाप्त केला आणि अध्ययनाच्या अंती त्यांनी ब्रह्मदेवाला विनंती केली की, 'देवा, आम्हाला आयुष्यभर आचरण करण्यासाठी काही उपदेश करा'. ब्रह्मदेवांनी तिघांनाही 'द' असा उपदेश केला. या एकाक्षर 'द' चा अभिधेने काही अर्थ लागेना, तेव्हा तिघेही या उपदेशाचे ग्रहण करण्यासाठी अंतर्मुख होऊन विचारप्रवण झाले व त्याचा लाक्षणिक अर्थ शोधू लागले. देव जेव्हा अंतर्मुख होऊन विचार करू लागले तेव्हा त्यांना असे जाणवले की, आपल्याजवळ भरपूर समृद्धी, ऐश्वर्य त्यामुळे आपले सगळे जीवन भोगविलासात जाते. सुखांचा, ऐश्वर्याचा उपभोग घेताना आपण इंद्रियांचे 'दमन' शिकले पाहिजे. तेव्हा 'द' मधून ब्रह्मदेवांना 'दमन' असे सुचवायचे असेल. मानवांना वाटले, आपल्याला घेणे तेवढे ठाऊक आहे देणे कधी जमतच नाही. कारण, अनुपकार बुद्धीने जे दिले जाते ते खरे दान. आपण कुणाला काही दिले तरी त्याचे पक्के स्मरण ठेवतो त्यामुळे परमार्थाने दान हे आपल्याला जमतच नाही. आपण स्वार्थच पाहतो. तेव्हा 'द' मधून ब्रह्मदेवांना 'दान' असे सुचवायचे असेल. दानवांनी विचार केला की, अरे आपण तमोगुणाने प्रेरित होऊन बलवान असल्याने क्रूरपणे वागतो. आपल्याजवळ दया नाही. तो गुण आपण शिकून घ्यावा आणि आयुष्यभर आचरणात आणावा यासाठी 'द' मधून ब्रह्मदेवांना 'दया' असे सुचवायचे असेल. तिघांनी ब्रह्मदेवांना विचारून आपल्याला योग्य कळले आहे की नाही याची खात्री करून घेतली. ब्रह्मदेवांनी त्यांना त्यांच्या त्यांच्या मतीप्रमाणे योग्य तेच कळले आहे असे अनुमोदन दिले.

याच आशयाची लौकिकात एक हत्ती आणि चार आंधळ्यांची गोष्ट सांगितली जाते. चार आंधळ्यांना हत्तीच्या ज्या भागाला स्पर्श करता आला त्याप्रमाणे त्यांना तो हत्ती तसा भासला.

एकूण काय तर भाषेच्या ठिकाणी राहणाऱ्या अभिधादी तीन शक्ती असोत वा ज्ञानेंद्रियांना होणाऱ्या जाणीवा असोत या प्रकृतीच्या अधीन राहून कार्य करतात. ज्याची जशी प्रकृती त्याची तशी बुद्धी व त्यातून तसे आकलन आणि त्याच्या बुद्धीसापेक्षतेने त्याचे ते आकलन बरोबर असते. हेच ब्रह्मदेवाच्या अनुमोदनाचे कारण आहे.

आता 'काट्याच्या अणीवर वसले तीन गाव' हे ज्ञानदेवांचे भारुड ही अशीच अप्रतिम रचना आहे जी सरलार्थाने म्हणजे अभिधेने समजत नाही. तेव्हा यथामती लक्षणेचा व्यापार करावा लागतो

आणि प्रत्येक कडव्यातून व्यक्त होणारा लक्ष्यार्थ समग्र भारुडाला व्यंजनेच्या अत्युच्च पातळीवर पोहोचवतो. 'पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना' या उक्तीप्रमाणे या भारुडाचा अनेकांना अनेक प्रकारे अर्थ लागू शकतो आणि तो अर्थ लागणे हे ज्याच्या त्याच्या प्रकृतीचा भाग आहे. माझ्या अल्पमतीला हे भारुड जसे उमगून आले ते पुढील विवेचनातून प्रस्तूत करीत आहे.

उपरोक्त भारुडाचा विचार करण्यासाठी प्रत्येक कडव्याचा क्रमाक्रमाने विचार करू. कारण या भारुडातील घडणाऱ्या घटनांना क्रम आहे. त्या क्रमात तर्कशुद्ध सुसंगती आहे आणि हे सर्व अनुभवाच्या निकषावर खरे उतरते म्हणजेच प्रत्यक्ष प्रमाणाने सिद्ध आहे. अर्थात ज्ञानेश्वरमहाराज हे वागीश्वरच असल्यामुळे त्यांच्या भारुडामध्ये हे गुण असणे हे स्वाभाविकच स्पष्ट आहे.

तर सुरुवात करू या श्लोक क्रमांक १

काट्याच्या अणीवर वसली तीन गावें ।
दोन ओसाड एक वसेचिना ॥१॥

मूलतः काट्याची अणी म्हणजे काट्याचे अणुकुचीदार टोक. या टोकावर गावे वसणे अशक्य. त्यात तीन गावे वसली म्हणजे अशक्यप्राय गोष्ट घडली. तत्त्वतः जी गोष्ट अस्तित्वातच असू शकत नाही ती भ्रान्तिमुळे खरी वाटू लागली. हा काटा कोणता की ज्याने या गावांना वसण्यासाठी जागा दिली? तर हा काटा आहे संकल्पाचा. मी कुणीतरी आहे हा संकल्प झाला आणि आपोआपच गावांना वसण्यासाठी जागा मिळाली. मग गाव म्हणजे काय? तर माझी राहण्याची जागा. मग हा 'मी' राहतो कुठे? तर तीन गावांत राहतो. ही तीन गावे म्हणजे तीन अवस्था : जागृती, स्वप्न आणि सुषुप्ती. मी जागृतीतही असतो. स्वप्नातही मीच असतो आणि गाढ झोप म्हणजे सुषुप्तीतही मी असतोच. आता यापैकी स्वप्न आणि सुषुप्तीचा विचार करता, या दोन गावांचा काही उपयोग नाही कारण सुषुप्तीत मी इतका गाढ झोपी जातो की मला माझ्या अस्तित्वाचेही भान राहत नाही आणि स्वप्नात तर मनाचेच खेळ चालू असतात. तेथे वास्तवाला थाराच नसतो म्हणून या दोन्ही गावांना ओसाड म्हणजे 'मी' असून नसलेली म्हणजे निर्जन म्हंटली आहेत. आता राहिले गाव जागृतीचे. तर ते 'वसेचिना'. 'वसेचिना' म्हणजे काय? तर जागृती ही अवस्था स्थिर नाही. म्हणजे रोज झोपेतून उठल्यावर जागृतीचा अनुभव नवा असतो. कालचा आज नाही, आजचा उद्या नाही. ही बदलत राहणारी अवस्था आहे. परिवर्तनशीलता हा हिचा धर्म आहे. जन्माला येण्यापासून

मरेपर्यंत या जागृतीतला 'मी' बाल्यावस्थेपासून म्हातारपणापर्यंत बदलत आहे. म्हणून ही अवस्था स्थिर मानता येत नाही. म्हणून माऊली या गावाला 'वसेचिना' असे म्हणतात.

आता श्लोक क्रमांक २

> वसेचिना तिथे आले तीन कुंभार ।
> दोन थोटे एका घडेचिना ॥२॥

या 'वसेचिना' गावात तीन कुंभार आले. कुंभार म्हणजे मडकी घडविणारा. मडकी घडविणारा म्हणजेच मातीवर संस्कार करणारा. हे तीन कुंभार कोण? तर मन, बुद्धी आणि चित्त. खरे तर हे तिघे अंतःकरणचतुष्टयांपैकी तीन. अंतःकरणाचे संकल्प-विकल्पात्मक स्वरूप मन. त्याचेच निश्चयात्मक स्वरूप बुद्धी आणि त्याचे एकाग्रवृत्तिधारक स्वरूप चित्त. यांपैकी करू की नको करू असे संकल्प-विकल्पात्मक स्वरूप असल्याने मन काहीही करण्यास अपात्र ठरते आणि बुद्धी निश्चयात्मक स्वरूप असल्याने काही करण्यास प्रेरणा देऊ शकेल पण स्वतः काही करण्यास असमर्थ असते म्हणून मन आणि बुद्धी दोन्ही थोटे ठरतात. म्हणजे प्रत्यक्ष कृती करण्यास अक्षम ठरतात. आता राहिले ते चित्त. मनुष्य कोणतेही कार्य करताना त्याच्या चित्तात तशा प्रकारच्या चित्तवृत्ती उत्पन्न होतात. त्या इंद्रियांशी तादात्म्य पावतात आणि मग त्या इंद्रियांद्वारे तो मनुष्य ते कार्य करू शकतो असा योगशास्त्राचा सिद्धांत आहे. तेव्हा चित्त काही एक कार्य करण्यास पात्र आहे. पण त्याच्याने काही 'घडेचिना'. 'घडेचिना' म्हणजे काय? तर चित्त इतके चंचल की, कोणतेही कार्य करताना ते निश्चल होईचना. त्यामुळे काहीही त्याच्याने 'घडेचिना'. रामदास स्वामी म्हणतात, यथासांग रे कर्म ते ही घडेना. म्हणून 'घडेचिना'.

आता श्लोक क्रमांक ३

> घडेचिना त्याने घडली तीन मडकी ।
> दोन कच्ची एक भाजेचिना ॥३॥

या 'घडेचिना' कुंभाराने घडविली तीन मडकी. ही तीन मडकी म्हणजे त्याची कर्मे. या कर्मांची विभागणी तीन प्रकारांत केली. संचित, प्रारब्ध आणि क्रियमाण, अशी ही तीन मडकी. यापैकी संचित कर्मे अजून भोगायला आली नाहीत म्हणून ती अपक्व म्हणजे कच्ची आणि प्रारब्ध कर्मे म्हणजे जी भोगून संपवण्यासाठी हा जन्म घेतला ती कर्मे. त्यातली काही भोगली, काही उरली या अर्थाने ती अर्धवट भाजलेली म्हणून कच्ची. संपूर्ण जीवनकाळ जोवर व्यतीत होत नाही तोवर

प्रारब्ध भोगून संपले असे आपण म्हणू शकत नाही. एखादे फळ जर पूर्ण पिकलेले नसेल तर ते कच्चे आहे असेच आपण म्हणतो. पूर्णत्वाला न पोहोचल्याने प्रारब्ध सुद्धा अपरिपक्व फळाप्रमाणे कच्चे आहे. त्यामुळे संचित आणि प्रारब्ध ही दोन कच्ची मडकी आणि क्रियमाण कर्म हे मडके 'भाजेचिना'. आता 'भाजेचिना' म्हणजे काय? तर मडके केव्हा भाजते? याचे उत्तर असे की, त्याला अग्नीत तापविले की ते भाजते. कर्मरूपी मडकी भाजण्यासाठी कोणता अग्नी आवश्यक आहे? तर समबुद्धीचा अग्नी. पंचीकरणानुसार बुद्धी ही अग्नीपासून तयार झाली आहे. कोणतेही कर्म करताना बुद्धीने यथायोग्य विचार करून निष्कामपणे केल्यास ते कर्म मनुष्याला बाधत नाही असे भगवद्गीता सांगते. पण, असे जे कर्म बुद्धिरूपी अग्नीत आपण भाजून घ्यायला पाहिजे ते आपण भाजत नाही. कर्मबीजाचे भर्जन न झाल्याने ते कच्चे कर्म प्राक्तनात जमा होत जाते आणि कधीतरी पुन्हा भोगायला येते. त्यामुळे क्रियमाण कर्म हे 'भाजेचिना'.

आता श्लोक क्रमांक ४

भाजेचिना त्यांत रांधले तीन मुग ।
दोन हिरवे एक शिजेचिना ॥४॥

या 'भाजेचिना' मडक्यात तीन मूग रांधले. मूग रांधले म्हणजे अन्न शिजवले. प्रथमतः हे पाहिले पाहिजे की अन्न कसे तयार होते? मैत्रायणी उपनिषदात म्हंटल्याप्रमाणे अन्नाची योनी काळ आहे. अर्थात अन्न हे काळातून जन्माला येते. उदाहरणार्थ शेतीतील पिके ही ठराविक काळाने ऋतू, हंगामाप्रमाणे उत्पन्न होत असतात आणि पिकत असतात. या अन्न तयार होण्याच्या क्रियेमध्ये काळ महत्वाची भूमिका निभावतो. आणि पुढे जाऊन हे ही तितकेच खरे आहे की, सर्व अन्न शेवटी काळाच्याच भक्ष्यस्थानी पडते. 'भाजेचिना' मडक्यात जे मूग शिजवले ते मूग ही शेवटी काळातच परिणत होतात. येथे मूग म्हणजे सर्वप्रकारच्या क्रिया. क्रियमाण कर्माने प्रवृत्त होऊन केल्या जाणाऱ्या सर्व क्रिया या अंततः तीन प्रकारच्या काळांत समाविष्ट होतात. ते तीन काळ म्हणजे तीन मूग. इथे 'मूग' हाच शब्द यासाठी उचित ठरतो कारण **मू**लतः **ग**मनशील असणारा तो काळ. भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ. त्यापैकी भूतकाळ आणि भविष्यकाळ हे दोन हिरवे मूग. म्हणजे ते दोन्ही खाण्यासाठी अयोग्य. भूतकाळ होऊन गेला आणि भविष्यकाळ व्हायचा आहे. त्यामुळे प्रत्यक्षात त्यांचा उपभोग घेण्यास ते अयोग्यच म्हणावे लागतात. उरले ते फक्त वर्तमानकाळरूपी मूग. हा वर्तमानकाळ असा आहे की तो 'शिजेचिना'.

ISSN 2278-5655

आता ‘शिजेचिना’ म्हणजे काय? तर तो तर कायम चालूच आहे. वर्तमानकाळ कधी संपतच नाही. वर्तमानकालीन माझ्या क्रिया अव्याहत चालूच आहेत. गंमत अशी आहे की, आता ही वर्तमानातली क्रिया संपेल म्हणजे शिजेल आणि मग मी हिचा आस्वाद घेईन म्हणता म्हणता क्रिया पूर्ण होते. पण, क्रिया पूर्ण होताच भूतकाळात जमा होते. अशाप्रकारे वर्तमानकाळातला मी पुन्हा उपाशीच. पुन्हा नियतीबलाने पुढच्या क्रियेत ओढला जातो. म्हणून वर्तमानकाळ हा ‘शिजेचिना’ प्रकारचा मूग आहे.

आता श्लोक क्रमांक ५

> शिजेचिना तेथे आले तीन पाहुणे ।
> दोन रुसले एक जेवेचिना ॥५॥

आता हे ‘शिजेचिना’ मूग खायला आले तीन पाहुणे. हे तीन पाहुणे म्हणजे माझे तीन देह. ते कोणते? तर, आधिभौतिक, आधिदैविक आणि आध्यात्मिक. देहाला पाहुणे म्हणण्याचे कारण काय? तर, वास्तविकतः देह हा जगातला पाहुणाच असतो. तो त्याची आयुर्मर्यादा असेपर्यंत राहतो आणि नंतर गतप्राण होऊन निघून जातो. या तीन देहांपैकी आध्यात्मिक देह आणि आधिदैविक देह यांच्याकडे आपण कधी लक्षच देत नाही. आध्यात्मिक देह म्हणजे जो आत्मिक प्रगतीचा कारक आहे आणि आधिदैविक देह म्हणजे जो इंद्रियांच्या अधिष्ठात्री देवतांचे निवासस्थान आहे. या दोन देहांच्या गरजांच्या बाबतीत आपण दुर्लक्ष करतो म्हणून हे दोन देह रुसले आणि एक आधिभौतिक देह आहे जो की आपले भौतिक स्तरावरील अस्तित्व प्रकाशमान करतो ज्याच्या साठी आपण मरमर झटत असतो तो ‘जेवेचिना’. ‘जेवेचिना’ म्हणजे त्याचे जेवणात मन लागेना. वास्तविकतः देह म्हणजे भोग उपभोगण्याचे साधन. पण, नियतीने दिलेले भोग निमुटपणे भोगायचे सोडून आपण मला हे हवे, ते नको, असे असावे, तसे नसावे. अशा नाना कल्पना, आशा, चिंता इत्यादींना कवटाळून बसतो की, पुढे आलेले भोग गोड मानून जेवत/ भोगत नाही. म्हणून हा आधिभौतिक देह ‘जेवेचिना’.

आता श्लोक क्रमांक ६

> जेवेचिना त्याला दिल्या तीन म्हशी ।
> दोन वांझ्या एक फळेचिना ॥६॥

हा जो 'जेवेचिना' असा अधिभौतिक देह त्याला तीन म्हशी दिल्या. म्हशी म्हणजे ज्यांचे दोहन केले असता त्या दूध देतात. मग म्हशीच का म्हंटले? गायी दिल्या असे का नाही म्हंटले? तर गायी या शब्दाचा अर्थ संस्कृतमध्ये समृद्धी, संपन्नता याच्याशी जोडला आहे. गाय ही कामधेनु असते आणि कामधेनु ही इच्छेनुसार फळते. इथे हा अर्थ अभिप्रेत नाही. म्हशी म्हंटल्यामुळे दोहन क्रियेशी संबंधित गाय या जातीची व्यावृत्ती होते. तेव्हा म्हशी मधून काय अपेक्षित आहे? तर, दोहन केले असता दूध देणे आणि एरव्ही शेण देणे. 'महिष' हा संस्कृत शब्द आहे. त्याचे स्त्रीलिंगी रूप महिषी होते. ज्ञानदेवांनी महिष शब्दाची योजना करताना 'महा-इष' म्हणजे मोठी इच्छा अशी व्युत्पत्ती केली असावी. संस्कृतमध्ये इष हा धातू इच्छा या अर्थी येतो. म्हणून इथे म्हशी म्हणजे इच्छा. इच्छांचे दोहन केले असता त्या फलद्रूप होतात. एरव्ही या इच्छा मनाला सतत टोचणी लावून राहतात. इच्छांचे फलित म्हणजे दूध आणि टोचणी म्हणजे शेण. आता या इच्छांना आणखी एक संस्कृत शब्द आहे एषणा. एषणा तीन प्रकारच्या : लोकेषणा, वित्तेषणा आणि कामेषणा. मला लोकांत प्रतिष्ठा मिळावी, संसार व्हावा, पुत्रपौत्रादी असावे ही झाली लोकेषणा. भरपूर धनसंपत्ती मिळावी, ही झाली वित्तेषणा आणि बंगला हवा, गाडी हवी, अमके हवे, तमके हवे ही झाली कामेषणा. पण, या इच्छांच्या मूळाशी काय कार्य करते? तर प्रवृत्ती. प्रवृत्तीला कोण जन्म देते? तर तीन कारक स्मृती, श्रुती आणि कृती. स्मृती म्हणजे कुणाचे तरी काहीतरी आठवते तसे आपले असावे असे वाटते. श्रुती म्हणजे कुठेतरी काहीतरी ऐकलेले असते तसे आपण करावे, व्हावे, राहावे असे वाटते आणि कृती म्हणजे एखादी क्रिया करण्याविषयी प्रवृत्ती. मूळ म्हशी या तीन आहेत : स्मृती, श्रुती आणि कृती. यापैकी जोवर कृतीची जोड नाही तोवर स्मृती आणि श्रुती कधीच फळत नाहीत. त्यामुळे त्या दोघी स्वतंत्रपणे वांझा आहेत. एक कृती नावाची म्हैस आहे जी फळेल अशी आपण आशा करू शकतो. पण, ती 'फळेचिना'. आता 'फळेचिना' म्हणजे काय? तर, मी कृती तर करतो. पण, मला कधीही मनासारखे फळ मिळत नाही. माझ्या कृतीला जे फळ मिळते ते स्वायत्त नसून अदृष्टाधीन असते. या अदृष्टालाच दैव किंवा नशीब असेही म्हणतात. प्रयत्नांच्या जोडीला नशीब आणि वेळेने साथ दिली तर मला फळ मिळते आणि जे मिळेल त्यातच समाधान मानावे लागते. प्रयत्न, नशीब आणि वेळ या तीन गोष्टी जर दैवदुर्विपाकाने एकत्र जमून आल्या नाहीत तर मी कितीही कृती केली तरी ती 'फळेचिना' असे होते.

आता श्लोक क्रमांक ७

फळेचिना तिला झाले तीन टोणगे ।
दोन मेले एक जगेचिना ॥७॥

आता ही जी कृती नावाची इच्छारूपी म्हैस आहे, ती तीन टोणग्यांना जन्म देते. टोणगे म्हणजे रेडे. हे तीन टोणगे कोणते? तर काम, क्रोध आणि मोह. आपल्या कृतीतून मनासारखे फलित निष्पन्न झाले तर मीच केले, मी शहाणा, मी मोठा असा मोह उत्पन्न होतो. मनासारखे नाही झाले तर क्रोध उत्पन्न होतो आणि समजा एकदा यश मिळाले की अजून पुढे हे करावे, ते मिळवावे असा काम उत्पन्न होतो. यापैकी क्रोध आणि मोह हे दोघे काही काळासाठी असतात पण, कालांतराने समज येईल तसे किंवा विचारांती नष्ट होतात. त्यामुळे ते दोघे जन्माला आल्यानंतर मेले असे होते. पण, काम नावाचा जो टोणगा आहे, तो 'जगेचिना'. हा काम 'जगेचिना' म्हणजे काय? तर, बघा एखाद्या बाईला मूल होते आणि मरते. पुन्हा दुसरे मूल होते आणि मरते असे अनेकवार होते तेव्हा आपण म्हणतो की त्या बाईचे मूल जगेचना. हा कामही असाच आहे. एक काम उत्पन्न होतो. इप्सित साध्य झाल्यावर नष्ट होतो. म्हणून इच्छाचक्र इथे थांबत नाही. ती परत दुसऱ्या कामाला जन्माला घालते. तो संपतो तोच तिसरा उत्पन्न होतो म्हणून हे कामाचे जगणे मरणे अनिवार चालत राहते अतः माऊली म्हणतात काम हा टोणगा 'जगेचिना'.

आता श्लोक क्रमांक ८

जगेचिना त्याचे आले तीन रुपये ।
दोन खोटे एक चालेचिना ॥८॥

हा जो 'जगेचिना' काम आहे तो मनुष्य व्यवहारात चालवतो आणि तो काम विकून रुपये कमावतो. हे रुपये तीन. एक सुख, दुसरे दुःख आणि तिसरी ईर्षा. काम विकून सुख, दुःखाची प्राप्ती होते हे सर्वमान्य आहे. पण, ईर्षा कशी उत्पन्न होते? तर, स्पष्ट आहे की, आपल्याला एखादी गोष्ट मिळाली की दुसऱ्याच्या तशाच गोष्टीशी आपण तुलना करू लागतो. जसे परीक्षेचे पेपर तपासून गुरुजींनी वर्गात मुलांच्या हातात पेपर दिले की स्वतःचे गुण/मार्क्स बघितल्यानंतर

मुले मित्रांच्या गुणांची/ मार्कांची चौकशी करू लागतात. मग तू पुढे की मी पुढे? तू हुशार की मी हुशार? होते स्पर्धा सुरु. तसेच मोठ्यांचे. त्याला जास्त की मला जास्त? तो जास्त श्रीमंत की मी जास्त श्रीमंत? ईर्षा सुरु. आता सुख, दुःख हे तर क्षणिक असतात म्हणून ते खोटे. पण, ईर्षा क्षणिक नसते. पण, इर्षेचे नाणे जगाच्या बाजारात चालवायला गेलो तर चालत नाही. अमक्याला तसे मिळाले असे म्हणून मला तसे द्या असे कोणाला सांगायला गेलो तर काही मिळत नाही. म्हणून हे इर्षेचे नाणे 'चालेचिना'.

आता श्लोक क्रमांक ९

> चालेचिना तिथे आले तीन पारखी ।
> दोन आंधळे एका दिसेचिना ॥९॥

माझे हे इर्षेचे नाणे का चालेना म्हणून माणसाला प्रश्न पडतो. तेव्हा तो या नाण्याची परीक्षा करण्यासाठी परीक्षक नेमतो. हे तीन परीक्षक म्हणजे मन, बुद्धी आणि अहंकार. यापैकी मन आणि बुद्धी हे स्वतःच्याच भावनांचे समर्थन करतात. मन आणि बुद्धी हे स्वार्थाने आंधळे झालेले असतात म्हणून अहंकाराला विचारावे तर त्याला काही 'दिसेचिना'.

आता श्लोक क्रमांक १०

> दिसेचिना त्याला मारल्या तीन बुक्क्या ।
> दोन हुकल्या एक लागेचिना ॥१०॥

हा जो मला काही 'दिसेचिना' म्हणणारा अहंकार, तो खोटे बोलतो म्हणून देव त्याला तीन बुक्क्या घालतो. ह्या तीन बुक्क्या म्हणजे तीन ताप. आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक ताप असे हे तीन ताप मनुष्याला सहन करावे लागतात. त्यापैकी आध्यात्मिक ताप सहन करण्याच्यावेळी हा अहंकार, 'आत्मा म्हणून काही अस्तित्वात नाही', 'जे काही आहे ते हे जग आणि हा देहच आहे', 'पाप पुण्य म्हणून काही नसते', अशा चार्वाकासारख्या वल्गना करतो आणि आध्यात्मिक ताप सहन करताना जो बोध करून घ्यायला हवा तो करून घेत नाही म्हणून ही बुक्की हुकली.

आधिदैविक बुक्की म्हणजे इन्द्रियाधिष्ठित देवतांचा कोप, जरा, व्याधी इत्यादी. पण, ते भोगताना अहंकार स्वतःला काही लावून घेत नाही. 'वात, पित्त, कफ बिघडले' असे म्हणून शरीराच्या माथी दोष देतो आणि शरीर बिचारे मुकाट्याने भोगते. त्यामुळे ही सुद्धा बुक्की हुकली.

आता राहिली शेवटची आधिभौतिक बुक्की जिच्यामुळे अपमानादी व्यावहारिक हानी सहन कराव्या लागतात. पण, अहंकार इतका निर्ढावलेला असतो की, निर्लज्जपणे तो तरीही तसाच राहतो म्हणून माऊली म्हणतात, याला 'लागेचिना'.

असा हा अहंकार म्हणजे 'मी' पणा जाता जात नाही म्हणून 'मी' कुणीतरी आहे' हा संकल्पाचा काटा जसाच्या तसा उभा आहे आणि युगानुयुगे कल्पानुकल्पे या काट्याच्या अणीवर गावे वसत आहेत आणि पुढच्याही गोष्टी घडत आहेत. यातून तरणोपाय तो एकमेव गुरूच करु शकतात म्हणून शेवटच्या श्लोकात माऊली म्हणतात,

श्लोक क्रमांक ११

ज्ञानदेव म्हणे याचा तो अनुभव ।
सद्गुरूवाचुनि कळेचिना ॥११॥

हे समजण्यासाठी, आम्हाला हे समजावून देण्यासाठी एकमेव सद्गुरूच समर्थ आहेत. त्यामुळे आम्ही सद्गुरुरायांना शरण आहोत. त्यांनी आमच्या बोधाकरिता, उद्धाराकरिता योग्य वाटेल तो उपाय करावा. 'सद्गुरुवाचोनि सापडेना सोय | धरावे ते पाय आधी आधी |'

**संदर्भग्रंथ सूची:**

उपनिषत्संग्रहः, शास्त्री जे. एल., मोतीलाल बनारसीदास पब्लिशर, दिल्ली, १९९८

वेदान्तसार, जोग द. वा., मु. द. जोग प्रकाशक, पुणे, तृतीयावृत्ती, २००५

सांख्यकारिका कौमुदीप्रकाश, जोग. द. वा., मु. द. जोग प्रकाशक, पुणे, द्वितीयावृत्ती, २००३

सार्थ ज्ञानेश्वरी, दांडेकर शं. वा., वारकरी शिक्षण संस्था, पुणे, २०१६

पातंजल योगदर्शन, कोल्हटकर कृ. के., आदित्य प्रतिष्ठान, पुणे, तृतीयावृत्ती, २००७

बृहद्धातुकुसुमाकरः, मिश्र हरेकान्त, चौखम्बा संस्कृत प्रतिष्ठान, दिल्ली, १९९९